MAH MUL/03051/2012 UGC Approved Sr.No. 62759 Vidywarta® February 2018 Special Issue 01
ISSN: 2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

संपादक मंडल

मुख्य संपादक

प्रा.बहिरम देवेंद्र (हिंदी) डॉ. योगिता रांधवणे (मराठी)

सहायक संपादक

प्रा.नारायण हिरडे डॉ. राजेंद्र ठाकरे

डॉ. नीतिन थोरात प्रा. बापु देवकर

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vaidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

| | | |
|---|---|---|
| 20. | संत साहित्य स्वरूप व परंपरा<br>प्रा.डॉ.शेटे देविदास मल्हारी. | 90 |
| 21. | मराठी संत साहित्य परंपरा व स्वरूप<br>श्री. डॉ. अनिल बांगर | 98 |
| 22. | संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिक उपदेशात्मक विचार<br>प्रा.डॉ.अशोक शिंदे | 105 |
| 23. | संत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान<br>प्रा. डॉ. हनुमंत भवारी | 110 |
| 24. | 'मराठी संत साहित्यातील भक्तीस्वरुप'<br>प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने | 113 |
| 25. | मराठी संतसाहित्याची परंपरा व स्वरूप<br>प्रा.डॉ. मालुंजकर मच्छिंद्र केरुजी | 119 |
| 26. | "मराठी व हिंदी संत साहित्याचा तुलनात्मक अभ्यास "<br>श्री.संदीप उल्हाळकर, डॉ.राजेंद्र ठाकरे* | 123 |
| 27. | संत साहित्यातील आत्मचरित्रपर लेखन<br>प्रा. उत्तरेश्वर ज्ञा. सुरवसे | 132 |
| 28. | संत तुकारामांच्या साहित्यातील विचार<br>अनिल मोतीलाल वळवी, ता.जि. सातारा | 137 |
| 29. | समाज प्रबोधनकार तुकाराम<br>दया जेठे | 142 |
| 30. | मराठी संत साहित्य परंपरा व स्वरुप<br>प्रा.डॉ. राजेंद्र ठाकरे | 146 |
| 31. | संत तुकारामा महाराजांची कीर्तनभक्ती<br>डॉ. अनिता सदाशिव आढाव | 157 |
| 32. | संत ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीतील प्रतिमा आणि भावना<br>डॉ. प्रकाश सूर्यवंशी | 164 |
| 33. | समाज परिवर्तनातील संताचे योगदान<br>डॉ. सुधाकर शेलार | 169 |
| 34. | संत चळवळ आणि साहित्य<br>डॉ. वसंत सीताराम शेकडे | 172 |
| 35. | मराठी संत साहित्यातील सौंदर्यविचार<br>डॉ. प्रकाश नामदेवराव हिवराळे | 193 |
| 36. | संत साहित्यातील विविध विचार<br>प्रा.डॉ. प्रतिभा शंकर घाग | 199 |
| 37. | तुका झालासे कळस !<br>प्रा.डॉ. राजेंद्र ठाकरे — श्री संदीप युवराज मोटे | 202 |
| 38. | संत ज्ञानेश्वर : शिक्षणविषयक विचार<br>कु. सारिका संतराम पाचरणे | 209 |
| 39. | मराठी व संत साहित्याचा तुलनात्मक अभ्यास | 217 |




SHRI P. D. ... COLLEGE ... Dist. Pune

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No. 62759
Vidyawarta®
February 2018 Special Issue
0110

23

# संत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान

**प्रा. डॉ. हनुमंत भवारी**
श्री पद्ममणि जैन कला व वाणिज्य
महाविद्यालय पाबळ ता. शिरूर जि. पुणे.

=================================================================

**प्रास्ताविक**

मराठी साहित्यामध्ये संत साहित्याला विशेष महत्व आहे. संत साहित्याने फक्त धार्मिक किंवा अध्यात्मिक गोष्टींचाच प्रचार आणि प्रसार केला असे नाही तर समाज ज्या अंधश्रद्धेच्या जोखडात अडकला होता, त्यातून त्याला बाहेर काढण्याचा ही प्रयत्न संत साहित्याने केलेला दिसतो. संत साहित्याने मराठी साहित्यामध्ये फक्त भर टाकली नाही तर मराठी साहित्य समृदध केले व आपला स्वतंत्र ठसा उमटविला. मध्ययुगीन काळामध्ये मराठी समाजात वैचारिक बठैक व भावनात्मक समृदधता निर्माण करण्याचे काम संत साहित्याने प्रामुख्याने कले . संत साहित्याने समाजावर चांगले संस्कार घडावेत यासाठीच साहित्य निर्मितीचे व्रत हाती घेतल्याचे दिसते. या मध्ये अनेक संतांचे योगदान महत्वपूर्ण आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, परिसा भागवत, चोखा मेळा, कर्ममेळा, संत सखुबाई, संत जनाबाई, कान्होपात्रा अशा अनेक संतांनी वेगवेगळया माध्यमांच्या आधारे समाजजागृती करण्याचे काम अगदी मनोभावे केल्याचे आपणास पाहावयास मिळते. या शोधनिबंधाच्या अनुशंगाने आपण फक्त संत ज्ञानेश्वरांच्या संत साहित्यातील योगदानाच्या संदर्भात विचार करणार आहोत संत ज्ञानेश्वर तेराव्या शतकापासून ज्ञानेश्वरांनी केलेली ग्रंथनिर्मिती त्यांची अमृतवाणी मराठी माणसाच्या आत्मोधाराचे कार्ये करत आली आहे. आजही त्याचे महत्व तसूभरही कमी झाल्याचे दिसत नाही ज्ञानेश्वरांच्या काळातील महाराष्ट्राचा विचार कले । तर असे लक्षात येते की, ही सर्व माणसे मंत्र—तंत्र, जादुटोणा, भूत—प्रेत, ज्योतिषविद्या अशा अनेक अंधश्रद्धेमध्ये अडकलेला होता. अनेक कलाकुसर करणारी माणसेही त्यावेळी होती परंतु त्याच्याकडे दृष्टी नव्हती अशा माणसांना योग्य मार्ग दाखविण्याचे काम ज्ञानेश्वरांनी केल्याचे आढळते.

संत ज्ञानेश्वरांच्या कार्यासंदर्भात ल. रा. नसिराबादकर म्हणतात, ''काम, क्रोध, मोह, लोभ यांच्या आधीन झालेली सामान्य माणसे सत्य, शांती, विवेक, वैराग्य, व आत्मिक समाधान या गुणांना पारखी होत आहेत, हे ज्ञानदेवांनी पाहिले. अशा स्थितीत या अज्ञानी, मोहवश लोकांना मार्गदर्शन करावयाचे असेल, वैदिक धर्माची ओहटी थांबवयाची असेल, तर या भोळयाभाबडयांच्या धर्मभावनेला आध्यात्मविचारांची ठाम बठैक मिळवून देण्याशिवाय गत्यंतर नाही, अशी ज्ञानदेवांची खात्री पटली. दलित्तोधाराच्या प्रेरणेने त्यांनी धर्मजागृतीचे कार्ये हाती घेतले व आपला विचार सर्वसामान्यापर्यत पोहचविण्यासाठी 'आबालसुबोध' अशा मराठी भाषेत ज्ञानेश्वरांनी रचना केली. ज्ञानदेवांचे हे कार्ये साहित्यिक व सांस्कृतिक दृष्टया फार मोलाचे आहे. म्हणून तेराव्या शतकातील महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवनाचे व सा—या मराठी साहित्याचे ते आद्य प्रवर्तक ठरतात.''१ ल. रा. नसिराबादकर याच्या मताप्रमाणे खरोखरच ज्ञानेश्वरांचे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्वपूर्ण आहे.



SHRI PADMAMANI JAIN ... Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

यादव काळातील समाज हा अंधश्रदधेचा बळी ठरला होता. या समाजाला नव विचार देण्याचे काम त्या काळामध्ये संत ज्ञानेश्वरांनी केलेच, परंतु त्याचबरोबर त्यांनी केलेली ग्रंथनिर्मिती समाज जागृतिस कारणीभूत ठरली आणि त्यामुळे कवी म्हणून संत ज्ञानेश्वर अमर ठरले. प्रवचणे आणि कीर्तन करत आळंदीस माघारी येत असतांना त्यांनी नेवाशाला मुक्काम केला. आणि तेथेच त्यांना ग्रंथनिर्मितीची प्रेरणा मिळाली. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी असे तीन ग्रंथ लिहिले. अनेक अभंग, गौळणी, विराण्या, हरिपाठ असे साहित्य लेखन त्यांच्या नावावर आहे. ज्ञानेश्वरी हा त्याचं पहिला ग्रंथ गीतेच्या अठरा अध्यायांतील सातशे श्लोकांवर मूळ अध्याय आणि क्रम न बदलता नऊ हजार ओव्यांचे लेखन त्यांनी शके १२१२ मध्ये केले आहे. वारकरी संपदायाच्या उभारणीमध्ये ज्ञानेश्वरांचा आणि ज्ञानेश्वरीचे खूप मोलाचे योगदान आहे. या संदर्भात डॉ प्रा.ल. गावडे म्हणतात, ''महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या मंदिराचे वर्णन करतांना 'ज्ञानदेवे रचिला पाया' हे संत बहिणाबाई यांनी उच्चारलेले वचन अनेक दृष्टिने यथार्थ वाटते. या सप्रदायाचे प्रवर्तक कधी झाले, कोणी केले, या इतिहासापेक्षा या संप्रदायाला चिरस्थायित्व कोणी दिले, तत्वज्ञानाचा आणि आचारसंहितेचा भरभक्कम आधार या संप्रदायाला कोणी दिला, याचेच दिग्दर्शन बहिणाबाईंना येथे अभिप्रेत असावे, असे वाटतेकेवळ बहिणाबाईच नव्हेत, तर ज्ञानेश्वरमहाराजांच्या समकालीन आणि ज्ञानेश्वरोत्तरकालीन जे संत होऊन गेले, त्यांच्यापैकी अनेक संतांनी ज्ञानेश्वरांचे वारकरी संप्रदायातील हे अग्रेसरत्व मुक्तकंठाने मान्य केले आहे. हे अग्रेसरत्व सांगतांना कोणी ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वाचा गौरव केला आहे, तर अनेक संतानी ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे. या संप्रदायाच्या संदर्भातील महत्वाचे स्थान वर्णिले आहे.''२ डॉ. प. ल. गावडे यांच्या मताप्रमाणे निश्चितच वारकरी संप्रदायाचा पाया मजबूत करण्याचे काम ज्ञानेश्वर व त्यांच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथाने केले आहे. त्यामध्ये तिळमात्र शंका नाही. संत नामदेवही ज्ञानेश्वरीचे श्रेष्ठत्व मान्य करतात.

'नामाम्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ।।
एक तरी ओवी अनुभवावी ।।'

या महान ग्रंथातील एक तरी ओवी आपण अभ्यासावी, अनुभवावी तिचा अर्थ समजून घेऊन आचरणात आणावी. नामदेवांचे हे ज्ञानेश्वरी संदर्भातील वचन ऐकून मी हा प्रयोग करून पाहिला होता. ज्ञानेश्वरीतील एक ओवी अनुभवण्याचा प्रयत्न. ती ओवी होती.

''पाहेपा दुध पवित्र आणि गोड।
पाशे त्वचाचिया पदराआड।
परी अव्हेरूनी गोचिड।
अशुद्ध का सेविती।।

त्या ओवीचा अर्थ समजून घेतला आणि अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली. गोचिड गायीच्या कासेला अगदी चिटकून असते. परंतु त्याला मात्र दुध प्यायला मिळत नाही. ते अशुद्ध रक्तच पिते. अशाच प्रकारे माणसांच्या आजूबाजूला अनेक चांगल्या गोष्टी असतात. परंतु माणूस मात्र अशाच अशुद्ध म्हणजे, चुकीच्या गोष्टींचा पाठीमागे धावत असतो. जेंव्हा त्याला स्व:ची जाणिव होते. तेव्हाच त्याला आत्मज्ञान प्राप्त होते. ज्ञानेश्वरीतील एक ओवी जर माणसाच्या आयुष्यामध्ये एवढा प्रभाव पाडत असेल, तर निश्चितच नामदेवांनी ज्ञानेश्वरीची गायलेली थोरवी सर्वांनी मान्य करायला किंवा स्वत: अनुभव घ्यायला काहीच हरकत नाही. संपूर्ण ज्ञानेश्वरीचे वाचन, पारायणही अनेक ठिकाणी झाल्याचे आपणास पाहावयास मिळतात. गावोगावी होणा—या हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून हा होईना ज्ञानेश्वरीचे पारायण केले जाते. त्या निमित्ताने का होईना ज्ञानेश्वरीचे वाचन खेडोपाडी केले जाते. या संदर्भात ह. भ. प. किसन महाराज साखरे म्हणतात, ''गेल्या वर्षी ज्ञानेश्वरीच्या रचनेला ७०० वर्षे पूर्ण झाली. म्हणून जागोजागी पारायणं झाली, सप्ताह झाले; चर्चासत्र, व्याख्यानं झाली, ग्रंथप्रदर्शनं भरविली गेली.



SHRI PADMAMANI JAIN ... Pabal Tal. Shirur, Dist. Pune

ज्ञानेश्वरी या एका ग्रंथाबद्दल गेल्या एका वर्षात इतर कोणत्याही ग्रंथापेक्षा जास्त विचार झाला. वगे वेगळया ठिकाणी वेगवेगळया प्रकारचे अभ्यास करण्यात आले. एखादया ठिकाणी हजार माणसं पारायणाला बसली, तर दुस—या ठिकाणी दोन हजार, तिस—या ठिकाणी दहा हजार. अर्थात् हे त्या ग्रंथाच्या अभ्यासाचे प्राथमिक रूप आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीच सांगून ठेवलं आहे की, या ग्रंथाच्या श्रवणाने, पठणाने, अर्थचिंतनाने मोक्ष प्राप्त होईल.''३ ह. भ. प. किसन महाराज साखरे यांच्या म्हणण्यानुसार ज्ञानेश्वरी इतकी कोणत्याच ग्रंथाची चर्चा झालेली दिसत नाही पारायणांच्या अनुशंगाने का होईना परंतु लोकांना ज्ञानेश्वरी या ग्रंथाचा शब्दपरिचय, अर्थपरिचय होईल. यामुळे झालेल्या ज्ञानप्राप्तीला, स्वत्व प्राप्तीलाच मोक्ष म्हणायला हरकत नाही. कारण माणसाला एकादा स्वत:ची ओळख पडली की, त्याचा पुढचा प्रवास आपोआप होतो. त्याला कोणाच्या मार्गदर्शनाची गरज लागत नाही

**समारोप**

ज्ञानेश्वरांच्या या नव्या तत्वज्ञानात काही वेगळे सामर्थ्य होते. संस्कृतीची बंधने झुगारून व मराठी या लोकभाषेचा स्वीकार करून त्यांनी गीतेतील तत्वज्ञान सर्व सामान्यापर्यंत पोहचविले, या माध्यमातून लोकोद्धार केला दिनदलितांना दिलासा मिळाला मराठी भाषातून मिळालेल्या ज्ञानामुळे लोक अंतर्मुख होऊन विचार करू लागले. अशा प्रकारे ज्ञानेश्वरांच्या उदयामुळे, संत चळवळ उभी राहीली, धार्मिक प्रबोधन झाले, समाज अंतर्मुख झाला, जीवननिष्ठा बळकट झाली. सांस्कृतिक जीवनाला प्रेरणा मिळाली आणि सर्वसामान्यांचे जीवन आनंदमय, भक्तीमय झाल

**संदर्भ**

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन कोल्हापूर, सातवी आवृती १९९७, पृष्ठ ४३.

२. ज्ञानेश्वरी आणि वारकरी संप्रदाय, डॉ. प्र.ल.गावडे, वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य, संपा. डॉ. शिवाजीराव मोहिते, कर्मवीर प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती २००८, पृष्ठ १७३.

३. ह. भ. प. किसन महाराज साखरे, भाषण, संत साहित्य अभ्यासाच्या काही दिशा, संपा. डॉ. कल्याण काळे, रा. शं. नगरकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९९२, पृष्ठ १०.

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403